जून २००७

# सहकार कायदा दुभंगला

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व महाराष्ट्र सहकारी नियम १९६१ हा कायदा महाराष्ट्र राज्यातील सर्व प्रकारच्या २ लाख सहकारी संस्थांना नोंदणीपासून ते सहकारी संस्थेच्या विसर्जनापर्यंत लागू आहे. सन १९०२ मध्ये सहकारास सर निकोलसन् यांच्या प्रयत्नामुळे कायद्याचे स्वरूप प्राप्त झाले. व **इंग्लंडमधील फ्रेंडली सोसायटी ॲक्टच्या** धर्तीवर हा सहकारी कायदा २५ मार्च १९०४ मध्ये भारतात अंमलात आला. आणि १९१२ मध्ये सहकारी संस्थांचा कायदा अस्तित्वात आला. १९२५ साली मुंबई प्रांताने सहकाराचा कायदा संमत केला. सहकार क्षेत्रात शेतकऱ्यांबरोबर कारागीर व आर्थिकदृष्ट्या दुर्बल व्यक्ती यांचाही समावेश झाला. १९२५ च्या मुंबई सहकारी कायद्याने अधिक चांगली रहाणी, उत्पादनाच्या चांगल्या पध्दती व चांगला उद्योगधंदा या तीन सुत्रांचा पुरस्कार केला. आणि सर्वात महत्वाचे म्हणजे **एका सभासदास एक मत** या तत्वाचा पूरस्कार प्रथम या कायद्याने केला. १ मे १९६० पासून, महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर महाराष्ट्र राज्यात अंतर्भूत झालेल्या सर्व भागातील सहकारी संस्थांसाठी एकच कायदा असावा म्हणून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ ची निर्मिती करण्यात आली. **म्हणजेच हा सहकार कायदा २६ जानेवारी १९६२ पासून अंमलात आला.**

सहकारी संस्था ह्या तीचा उपविधी, सहकारी कायदा व त्या खालील नियम ह्यानुसार चालतात. आजपर्यंत सहकारी कायद्यामध्ये अनेक वेळा दुरूस्त्या झाल्या. त्या सर्व दुरूस्त्यांसह महाराष्ट्र राज्यातील सहकारी चळवळीतील कार्यकर्ते, सभासद व कर्मचारी या सर्वांनाच या अस्तित्वात असलेल्या सहकारी कायद्याने अधिकार व कर्तव्य याची लक्ष्मण रेषा आखून दिलेली आहे. आणि या कायद्याद्वारे सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांवर नियंत्रण करण्याची जबाबदारी व त्यासाठी महाराष्ट्र राज्यात **निबंधक** म्हणून सहकार आयुक्तांना प्रमुख नियंत्रक बनविले. आणि महाराष्ट्र राज्य सरकार यांच्या वैधानिक अधिकारानुसार त्यांनी कायद्याप्रमाणे काम करणे अभिप्रेत असल्याचे निश्चित झाले.

परंतू या सहकार कायद्याचे अंमलबजावणी मधील विभाजन वेळोवेळी सरकारच्या माध्यमातून करण्यात आले. आणि त्यात **सहकार तत्वावरील साखर कारखाने** यांचेवर सर्व प्रकारचे नियंत्रण **महाराष्ट्र राज्यात एक ''आय. ए. एस.'' अधिकारी साखर आयुक्त म्हणून** यांना प्रदान केलेले आहेत. तरी सुध्दा सहकार कायद्याचे जसेच्या तसे पालन करण्याची जबाबदारी साखर आयुक्तांवर आहे. परंतू सहकार कायदा मात्र या ठिकाणी दुभंगलेला , मोडतोड केलेलाच दिसत आहे.

म्हणून महाराष्ट्र राज्यातील सहकारी पतसंस्था व सहकारी साखर कारखाने ह्या संस्था कशा चालतात, चालविल्या जातात व त्याचा फायदा सभासदांना कसा होतो याचा मागोवा घेणे आवश्यक आहे.

सहकारी साखर कारखान्यांच्या **हेतू व उद्देशांमध्ये** स्वावलंबन, काटकसर, सर्वांगिण विकास, कल्याण, साधने इत्यादी मूलभूत बाबींचा समावेश आहे. व पतसंस्थांमध्ये सुध्दा याच मुद्यांचा समावेश आहे. चित्र मात्र दोन्ही ठिकाणी विरूध्द आहे. पतसंस्था कार्यक्षेत्रातील कुठल्याही व्यक्तिस ज्याने एका भागाची पूर्ण रक्कम प्रवेश शुल्कासह भरलेली आहे व जी व्यक्ती १८ वर्षांवरील आहे ती व्यक्ती कलम २२ मधील तरतूदीस अधिन राहून

सभासद होऊ शकते. किंबहूना पतसंस्था त्यांना सभासद करून घेतेच. परंतू सहकारी साखर कारखाने मात्र हा कायदा पाळायला तयार नाही. सहकारी साखर कारखान्याच्या उपविधीमध्ये शेतकऱ्याने सतत ३ वर्षे कमीत कमीत अर्धा एकर ऊस पिकवून कारखान्यास पुरविल्यानंतर त्याला सभासद करून घेण्याची जबाबदारी कारखान्याची आहे. मात्र हे सहकारी साखर कारखाने आपापल्या कार्यक्षेत्रांतील अशा हजारो शेतकऱ्यांना कारखान्याचे सभासद बनवून घेत नाही. किंबहूना त्यांच्या विस्कळीतपणाचा , निष्ठेचा, अज्ञानाचा, गैरसमजूतीचा व खोट्या भितीपोटी सभासदत्व करून घेतले जात नाही. ऊसाचा पुरवठा मात्र करवून घेतला जातो. **साखर आयुक्त व सहकार आयुक्त या ठिकाणी संबंधीत साखर कारखान्यावर गेले ५० वर्षांपासून कोणीही कारवाई करण्यास तयार नाही. साखर कारखान्यांनी शेतकरी / सभासदांना स्थापनेपासून केंव्हाच लाभांश दिला नाही. पतसंस्थांनी मात्र,** नोंदणीनंतर सर्वसाधारणपणे २-३ वर्षे गेल्यानंतर सभासदांना लाभांश देण्याची **फार मोठी वैधानिक जबाबदारी व आर्थिक नैतिकता पाळलेली आहे.** साखर व सहकार आयुक्तांनी कारखान्याच्या सभासदांना स्थापनेपासून त्यांच्या भागांवर केव्हाच लाभांश न दिल्यामुळे आतापर्यंत एकाही कारखान्यावर कारवाई केलेली नाही.

साखर कारखाने पहिल्या ५ वर्षातही तोट्यात, पुढच्या १० वर्षातही तोट्यात, पुढच्या २० वर्षातही तोट्यात. परंतु तोट्यात, चालणारी सहकारी संस्था यावर दोन्ही आयुक्तांनी एकाही कारखान्याचे संचालक मंडळ, कलम ७८ खाली बरखास्त केल्याचे एकही उदाहरण राज्यात नाही. उलटपक्षी पतसंस्था जर वरीलप्रमाणे सतत तोट्यात राहिली तर, पतसंस्थांचे संचालक मंडळ ताबडतोब बरखास्त केल्याची हजारो उदाहरणे आपल्या राज्यात आहेत. एवढेच नव्हे तर त्या संचालक मंडळावर कलम ८३ खाली व कलम ८८ खाली कारवाई करून, पतसंस्थांमधील कार्यकर्त्यांचे एकंदरीत वैयक्तिक जिवनमान सुध्दा या पध्दतीने शासनानेच उध्वस्त केलेले आहे. एवढ्यावर हे निबंधक थांबलेले नाहीत तर, संचालकांवर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करून कलम ७८, ८३ च्या आधारे तुरुंगातसुध्दा पाठविण्याची घाई पतसंस्थांच्या बाबतीत काटेकोरपणे पाळलेली आहे. परंतु सहकारी साखर कारखान्यांच्या बाबतीत अशा प्रकारची जबाबदारी दोन्ही निबंधकांनी केव्हाही पाळलेली नाही.

पतसंस्थांना कर्जामधून ठेवी, इमारत निधी, इतर निधी कपात करता येणार नाही, असे निर्बंध सहकार आयुक्तांनी काढलेले आहेत. साखर कारखान्याच्या बाबतीत मात्र शेतकऱ्यांच्या ऊसाच्या बिलातून बेकायदेशीर कपाती साखर कारखान्यांनी राजरोसपणे केल्यानंतरही,साखर व सहकार आयुक्तांनी कारखान्याच्या संचालक मंडळावर कुठलिही कारवाई केलेली नाही. जी रक्कम शेतकऱ्याला / ऊस उत्पादकाला / सभासदाला साखर कारख्यास देय लागत नाही. ती रक्कम साखर कारखाने राजरोसपणे **बिनपरतीची ठेव ,मुदत ठेव, ऊसविकास निधी, अल्पबचत , कारखाना पुरुस्कृत शिक्षण निधी, भाग विकास निधी, विस्तारवाढ ठेव, रुपांतरीय ठेव , इमारत निधी, साखर संकुल निधी, मुख्यमंत्री निधी,भुकंपग्रस्त निधी, दुष्काळ निवारण निधी, ट्रस्टसाठी निधी** इत्यादी निधीची बिनधास्तपणे वार्षीक सर्वसाधारण सभेच्या एका ठरावाने कारोडो रुपये बेकायदेशीररित्या कापले जातात. त्या निधिची पासबुके सुध्दा दिली जात नाहीत.व मुदत संपल्यानंतरही परत दिली जात नाहीत, असे फौजदारी स्वरुपाचे कामकाज साखर कारखाने करीत असताना देखील, साखर व सहकार आयुक्त काहीही कारवाई करीत नाही. पतसंस्था अशा प्रकाराच्या तत्सम कपाती कधीच करु शकत नाही व केलेल्या नाहीत.परंतु ठेवलेली रक्कम जर परत मिळाली नाही तर, पतसंस्थाचे संचालक मंडळ विनाविलंब

बरखास्त केले जातेच, त्याबरोबर सर्व दायीत्वाची जबाबदारी पतसंस्थाच्या संचालकावर निश्चीत करुन त्यांची चल– उचल मालमत्ता ताब्यात घेवून, त्याचा लिलाव करुन सहकार कायद्याप्रमाणे सहकार आयुक्त अत्यंत प्रांजळपणे काम करीत असताना दिसतात.परंतु साखर कारखान्याच्या बाबतीत शेकडो – करोडो रुपये राज्यातील साखर कारखानदांरानी शेतकाऱ्यांच्या ऊसाच्या बीलातुन बेकायदेशीर कपाती केल्याबद्दल कारवाई करीत नाही. सहकार कायदा प्रत्येक स्टेजवर सहकारी साखर कारखनदारी मध्ये अशाप्रमाणे दुभंगला जातो.

पतसंस्थांना सभासदाकंडून भाग व ठेव रुपाने निधी उपलब्ध होत असतो. व प्रसंगी जिल्हा बँकेतुन कर्जेही उपलब्ध होत असतात. ३६ महिने ते ६० महिन्यांच्या कालवधीत ही कर्जे पतसंस्थानी जिल्हा बँकेला परत करावयाचे असते. ते जर केले नाही तर, संचालक मंडळ बरखास्त करणे, त्या ठिकाणी प्रशासक नेमणे, कलम ८३ खाली जबाबदारी निश्चीत करणे, संचालकांना जेल मध्ये पाठविणे, त्यांची मालमत्ता विकणे इत्यादी कारवाया सहकार आयुक्त पतसंस्थांच्या बाबतीत अत्यंत प्रामाणिकपणे करीत असताना दिसतात. एवढेच नव्हे तर अशा प्रकाराची थकीत असणाऱ्या पतसंस्थेमधील संचालक , सहकाराच्या अशा कुठल्याही निवडणुकीत व इतरत्र सुध्दा अपात्र ठरविला जातो. परंतु साखर कारखान्यासाठी हा सहकार कायदा स्वत: दुभगूंन हातबल झालेल् दिसतो.साखर कारखान्यांनी घेतलेली १० वर्षा पुर्वीची मुदत कर्जाच्या, मुद्दलाचा एकही रुपया परत केलेला नाही,व्याजही वेळेवर भरत नाही. केव्हा दुष्काळाच्या नावाखाली, केव्हा रोगराईच्या नावाखाली केव्हा शेतकऱ्यांच्या नावाखाली, केव्हा पॅकेजच्या नावाखाली घेतलेली कर्जे परतफेडीस एकही कारखाना तयार नाही.महाराष्ट्र शासनाची कर्जावरील थकहमी सुध्दा या ठिकाणी कूचकामी ठरलेली आहे. आणि वर्षानुवर्ष शेकडो करोडो रुपये नागरी बँका, जिल्हा बँकांचे थकवुनही राज्यातील एकही साखर कारखान्याचे संचालक मंडळ कलम ७८ खाली बरखास्त करण्यात आलेले नाही. कारखान्यावरील संचालक मंडळामध्ये आजी – माजी लोक प्रतिनिधी यांच्या पदावर कुठलाही परिणाम होत नाही. आणि म्हणून साखर व सहकार आयुक्त अशाप्रमाणे आपली वैधानिक जबाबदारी साखर कारखान्याच्या बाबतीत करीत नाहीत. **कारण निर्णय घेणारे व कारवाई करणारे व साखर कारखाना चालविणारे हे इकडून तिकडून एकच असल्यामुळे कुठलीच कारवाई होत नाही.**

प्रश्न असा ऊभा राहतो की, सहकार कायद्याचे काय ? सभासदांचे काय ? ठेवीदारांचे काय ? शेतकऱ्यांचे काय ? व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या देशाची घटना सर्वांसाठी व सार्वभौमतेसाठी, समानतेसाठी लिहिली तिचे काय ? पतसंस्थांना शासकीय भाग – भांडवल वा कर्जाची थकहमी केव्हाच दिली जात नाही. परंतु पतसंस्था राज्यात अभिमानास्पद चालतात. लाखो सर्वसामान्य जनांचे आर्थिक जिवनमान उंचविण्याचे काम या पतसंस्था कोणाच्याही मदतीशिवाय, सवलतीशिवाय, पॅकेजशिवाय लोकांसाठी चालविल्या जातात. मग साखर कारखाने शेतकऱ्यांसाठी चालविले जात नाही, हे रोज शासनकर्त्यांना, लोकप्रतिनिधींना, प्रसिध्दी माध्यमांना , लेखापरिक्षकांना, आम जनतेला माहीत असताना देखील, कायद्याचे रक्षक व नियंत्रक साखर व सहकार आयुक्तांच्या माध्यमातून काय करीत आहेत ?

सहकार कायदा याप्रमाणे दुभंगतो आहे. समानतेवर भारत देशचाी निर्मिती झालेली आहे. किती दिवस हा दुजाभाव व त्याचा दुष्परिणाम लाखो शेतकरी, करोडो रूपयांच्या कर्जात असताना कर्जबाजारी माणसाकडून राजरोसपणे देय नसलेल्या रकमा ऊसाच्या बिलातून कापल्या जातात. कुठे गेली ति न्यायाची यंत्रणा व कायदा बनविणारी यंत्रणा ?

परंतु प्रत्येक गोष्टीला शेवट हा आहेच. तोंडात पाणी जाईपर्यंत संरक्षण दिले जाते. भविष्यात हे संरक्षण इच्छा असूनही दिले जाऊ शकणार नाही. या राज्यातील सर्वसामान्य जनताच सहकार कायदा दुभंगत असताना फार काळ लोकशाही प्रक्रियेत गुप्त मतदान पध्दतीने आपला रोष प्रकट केल्याशिवाय राहणार नाही, ही नैसर्गिक भविष्यवाणी आहे. मायबाप जनता जनार्दनास, कष्टकरी शेतकरी, कामगार व कार्यकर्त्यांना या गंभीर प्रश्नाची प्रकर्षाने माहीती व्हावी व यातून काहीतरी शिकावे व लूटमार करणाऱ्यांना न्याय मंदिरातून भोळ्याभाबड्यांना न्याय द्यावा यासाठी हा प्रपंच आहे.

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**